सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

मंत्रालय, विस्तार इमारत, दालन क्र. ४३८, ४ था मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

ई-मेल : tashi7.hted-mh@gov.in

क्र.संकीर्ण-११२४/प्र.क्र.६८/२४/तांशि-७, दि. १६ डिसेंबर, २०२४.

प्रति,

प्र. कुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,
लोणेरे, ता.माणगांव, जि. रायगड-४०२१०३.

**विषय:** बिंदूनामावली नोंदवह्या तपासून प्रमाणित करण्याबाबत.

**संदर्भ:** आपले पत्र क्र. डॉबाआतंवि/आस्था/खुलासा/बि.ना./२०२४/३६०, दि.२८/१०/२०२४.

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ येथील विभाग प्रमुख पदाची बिंदूनामावली नोंदवही सामान्य प्रशासन विभागाकडून प्रमाणित करुन देण्याबाबत विनंती केली आहे.

०२. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागा कडून त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६९/२०२४ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेस अनुसरुन आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे:-

विभाग प्रमुख या संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील पदांचा आरक्षणांचा तपशील खालीलप्रमाणे राहील :-

| अ. क्र. | तपशील | अ. जा. १३% | अ. ज. ७% | वि. जा . (अ) ३% | भ. ज . (ब) २.५% | भ. ज . (क) ३.५% | भ. ज. (ड) २% | वि. मा. प्र. २% | इ. मा. व. १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षणाचे प्रमाण/ टक्केवारी | ७.२८ | ३.९२ | १.६८ | १.४ | १.९६ | १.१२ | १.१२ | १०.६४ | २६.८८ | १०० |
| १ | मंजूर पदे | १ | १ | १ (आळीपाळीने) | | | | | १ | ४ | ८ |
| २ | भरलेली पदे | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ |
| ३ | रिक्त पदे | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ |
| ४ | दि.३०.८.२४ पर्यंतची संभाव्य रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | एकूण रिक्त पदे (३+४) | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ |
| ६ | मागणीपत्रा साठी उपलब्ध पदे | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ |

भरावयाच्या पदांची आरक्षण निश्चिती खालीलप्रमाणे राहील :-

| अ. क्र. | तपशील | अ. जा. १३% | अ. ज. ७% | वि.जा (अ) ३% | भ.ज . (ब) २.५% | भ.ज . (क) ३.५% | भ.ज . (ड) २% | वि. मा. प्र. २% | इ.मा. व. १९% | साशै माप्र १०% | आदुघ १०% | अरा खीव २८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चालू आरक्षणाची पदे | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ४ |

०३. तसेच सामान्य प्रशासन विभागाने आरक्षण निश्चिती करुन दिलेल्या टिप्पणीची छायांकित प्रत व संदर्भाधिन पत्रासोबत प्राप्त विभाग प्रमुख पदाची मूळ बिंदूनामावली नोंदवही सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

(समीर ढेरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव:

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४००००१,
२. अवर सचिव (तांशि-२), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

अनौ.सं.क्र.१४३/२०२४ सामान्य प्रशासन विभाग/आरक्षण-३

पूर्वपृष्ठावरील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या टिप्पणीस अनुसरुन सादर.

२. विभागाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड या विद्यापीठातील विभाग प्रमुख व अधिव्याख्याता या संवर्गांच्या दि.२६.०२.२०२४ अखेरची स्थिती असलेल्या बिंदूनामावल्यांची सहायक आयुक्त (मावक), कोकण यांनी प्राथमिक तपासणी केली असून अंतिम तपासणी व आरक्षण निश्चिती करुन देण्याची या विभागास विनंती केली आहे.

३. विभागाने टिप्पणीत नमुद केल्यानुसार, सन २०२३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील विभाग प्रमुख व अधिव्याख्याता या संवर्गांच्या बिंदुनामावल्यांची सामान्य प्रशासन विभागाकडून प्रमाणित करुन घेण्यात आलेली होती.

तथापि, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.२७.०२.२०२४ व दि.०६.०३.२०२४ मधील तरतूदींनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गास १० टक्के सामाजिक आरक्षण लागू करण्यात आले. सुधारित आरक्षणानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील विभाग प्रमुख व अधिव्याख्याता या संवर्गातील दि.२६.०२.२०२४ अखेरची स्थिती दर्शविणाऱ्या बिंदुनामावल्यांची विद्यापीठाने सहायक आयुक्त (मावक), कोकण यांचेकडून दि.०९.०८.२०२४ रोजी प्राथमिक तपासणी केली असून अंतिम तपासणी व आरक्षण निश्चितीसाठी प्रस्ताव या विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

४. विभागाने प्रस्तावामध्ये सादर केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक (पदवी व पदव्युत्तर पदवी) या संवर्गाच्या सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.२७.०२.२०२४ व दि.०६.०३.२०२४ मधील तरतूदींनुसार पुढीलप्रमाणे प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

५. १) सरळसेवा बिंदुनामावली:- विभाग प्रमुख

विभाग प्रमुख संवर्गाची बिंदुनामावली तपासली असता, सदर संवर्गामध्ये अराखीव प्रवर्गात ४ उमेदवार कार्यरत असल्याचे दिसून येते. परंतु, सदर उमेदवारांच्या नावासमोर त्यांचा जन्मदिनांक व सेवानिवृत्ती दिनांक नमुद करण्यात आलेला नाही.

तसेच, यापूर्वी या विभागाने सदर संवर्गातील रिक्त पदांची आरक्षण निश्चिती करुन दिलेल्या मान्यतेच्या टिप्पणीची प्रत प्रस्तावासह सादर केलेली नाही. सबब, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील विभाग प्रमुख या संवर्गाची बिंदूनामावली तपासणी करणे शक्य होणार नाही.

अवर सचिव

६. २) सरळसेवा बिंदुनामावली:- अधिव्याख्याता

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | अधिव्याख्याता |
| २ | एकूण मंजुर पदे | ५६ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | ५६ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजुर सेवा प्रवेश नियम | दि.१०.०९.२०१२ (पृ. २३९ /प.वि.) |
| ७ | मंजुर पदाचा आकृति बंध | दि.०४.०३.२०२१ (पृ. ६१/प.वि.) |

या पदाची दि.२६.०२.२०२४ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ७ | ४ | २ | १ | २ | १ | १ | ११ | २७ | ५६ |
| २ | भरलेली पदे | ४ | २ | ० | ० | २ | १ | ० | ३ | १७ | २९ |
| ३ | रिक्त पदे | ३ | २ | २ | १ | ० | ० | १ | ८ | १० | २७ |

अधिव्याख्याता संवर्गात ५६ मंजूर पदांचे आरक्षण अजा-७, अज-४, विजाअ-२, भजब-१, भजक-२, भजड-१, विमाप्र-१, इमाव-११, अराखीव-२७ पदे असे राहील.

दि.२६.०२.२०२४ रोजी सदर संवर्गात अजा-४, अज-२, भजक-२, भजड-१, इमाव-३ व अराखीव-१७ अशी एकूण २९ पदे कार्यरत आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत अजा-३, अज-२, विजाअ-२, भजब-१, विमाप्र-१, इमाव-८ व अराखीव-१० अशी एकूण २७ पदे रिक्त आहेत.

वरीलप्रमाणे अधिव्याख्याता या संवर्गाची सरळसेवा कोट्याची दि.२६.०२.२०२४ अखेरची बिंदूनामावली प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

७. **आरक्षण निश्चितीचा प्रस्ताव:-**

अधिव्याख्याता या संवर्गात सरळसेवेच्या कोट्यातील पदांचा आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे राहील:-

| अ. क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ७ | ४ | २ | १ | २ | १ | १ | ११ | २७ | ५६ |
| २ | भरलेली पदे | ४ | २ | ० | ० | २ | १ | ० | ३ | १७ | २९ |
| ३ | रिक्त पदे | ३ | २ | २ | १ | ० | ० | १ | ८ | १० | २७ |
| ४ | दि.३०.०८.२०२४ पर्यंतची संभाव्य रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | एकूण रिक्त पदे (३+४) | ३ | २ | २ | १ | ० | ० | १ | ८ | १० | २७ |
| ६ | मागणीपत्रासाठी | ३ | २ | २ | १ | ० | ० | १ | ८ | १० | २७ |

अधिव्याख्याता या संवर्गात एकूण २७ रिक्त पदांचे आरक्षण अजा-३, अज-२, विजाअ-२, भजब-१, विमाप्र-१, इमाव-८ व अराखीव-१० असे राहील.

८. अधिव्याख्याता या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्येनुसार आदुघ आणि साशैमाप्र करिता उपलब्ध असलेल्या १० टक्के आरक्षणानुसार येणारी पदे ही टप्प्याटप्प्याने भरावयाची असल्याने सदर पदे १० टक्के आरक्षणानुसार पूर्ण पदे भरली जाईपर्यंत खुल्या प्रवर्गाकरिता मंजूर पदांची गणना ४८ टक्के नुसार दर्शविण्यात आली आहे.

सदर संवर्गात यापूर्वी पदभरतीसाठी आरक्षण निश्चिती करुन देण्यात आली होती. तथापि, सदर आरक्षण निश्चितीनुसार पदभरती झालेली नसल्याने हे भरती वर्ष आदुघ प्रथम भरती वर्ष म्हणून गणण्यात येत आहे.

सदर संवर्गात साशैमाप्र करिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:- (प्रथम भरती वर्ष)

| एकूण भरावयाची पदे | साशैमाप्र करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| २७ | २.७ पुर्णांकात ३ पदे |

सदर संवर्गात आदुघ करिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:- (प्रथम भरती वर्ष)

| एकूण भरावयाची पदे | आदुघ करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| २७ | २.७ पुर्णांकात ३ पदे |

९. खालीलप्रमाणे भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चिती करुन देण्यात येत आहे.

| तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | साशैमाप्र १०% | आदुघ १०% | अराखीव २८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चालू आरक्षणाची पदे | ३ | २ | २ | १ | ० | ० | १ | ८ | ३ | ३ | ४ | २७ |

अधिव्याख्याता या संवर्गातील एकूण २७ रिक्त पदाचे आरक्षण अजा-३, अज-२, विजाअ-२, भजब-१, विमाप्र-१, इमाव-८, साशैमाप्र-३, आदुघ-३ व अराखीव-४ असे राहील.

१०. सदर सहमती ही केवळ सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आलेली आहे. समांतर आरक्षणाबाबत विभागाने आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी. तसेच, मागणीपत्रात दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाच्या पदाची संख्या विहित आरक्षणानुसार आवश्यक संख्येइतकी आहे किंवा कसे ही बाब विभागाने आपल्या स्तरावरुन खातरजमा करणे आवश्यक आहे.

अवर सचिव

११. विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार बिंदुनामावली तपासण्यात आली असून बिंदुनामावल्यांमध्ये तक्रारी किंवा न्यायालयीन प्रकरण उध्दभवल्यास सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील.

१२. उपरोक्तप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड या विद्यापीठातील अधिव्याख्याता या संवर्गांच्या सरळसेवा कोट्याच्या दि.२६.०२.२०२४ अखेरच्या बिंदूनामावली तपासणीस व आरक्षण निश्चितीस मान्यता देण्यास हरकत नसावी.

वरील अभिप्रायासह नस्ती उच्च व तंत्र शिक्षण विभागास परत पाठविण्यात यावी.

30.9.24

30.09.2024 क.अ.(श्रीम. शिंदे)

30.09.2024 अ.स.(श्री. चेमटे)

1.10.2024 उ.स.(श्री. खडसे)

4-10 सचिव (साविस)(श्री.पाटील)

प्र.स.(उ. व तं.शि.वि.)

14/10

अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

पूर्वपृष्ठावरील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या टिप्पणीस अनुसरुन सादर.

२. विभागाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड या विद्यापीठातील विभाग प्रमुख या संवर्गाच्या दि.२६.०२.२०२४ अखेरची स्थिती असलेल्या बिंदूनामावल्यांची सहायक आयुक्त (मावक), कोकण यांनी प्राथमिक तपासणी केली असून अंतिम तपासणी व आरक्षण निश्चिती करुन देण्याची या विभागास विनंती केली आहे.

३. विभागाने यापूर्वी सदर प्रस्ताव या विभागाच्या मान्यतेस्तव सादर केला असता, या विभागाने पृ.०५-८/टि.वि. अन्वये त्रुटी उपस्थित करुन फेरप्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार विभागाने आता पृ.०९-११/टि.वि.अन्वये फेरप्रस्ताव सादर केला आहे.

४. विभागाने प्रस्तावामध्ये सादर केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील विभाग प्रमुख या संवर्गाच्या सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.२७.०२.२०२४ व दि.०६.०३.२०२४ मधील तरतूदींनुसार पुढीलप्रमाणे प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

५. **सरळसेवा बिंदुनामावली:- विभाग प्रमुख**

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग | विभाग प्रमुख |
| २ | एकूण मंजुर पदे | ८ |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | सरळसेवा-१००% |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | ८ |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | होय. |
| ६ | मंजुर सेवा प्रवेश नियम | दि.१०.०९.२०१२ (पृ.२३९-२४४/प.वि.) |
| ७ | मंजुर पदाचा आकृति बंध | दि.०४.०३.२०२१ (पृ.६१-६९/प.वि.) |

या पदाची दि.२६.०२.२०२४ रोजीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजक ३.५% | भजब २.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | १ | १ | १ (आळीपाळीने) | | | | | १ | ४ | ८ |
| २ | भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ |
| ३ | रिक्त पदे | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ |

विभाग प्रमुख संवर्गात ८ मंजूर पदांचे आरक्षण १ पद- अ.जा. कायमस्वरुपी, १ पद- अ.ज. कायमस्वरुपी, १ पद-वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) व वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने, १ पद- इ.मा.व. कायमस्वरुपी व अराखीव-४ असे राहील.

अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

दि.२६.०२.२०२४ रोजी सदर संवर्गात अराखीव प्रवर्गात ४ पदे कार्यरत आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत अजा-१, अज-१, विजाअ-१, इमाव-१ अशी एकूण ४ पदे रिक्त आहेत.

वरीलप्रमाणे विभाग प्रमुख या संवर्गाची सरळसेवा कोट्याची दि.२६.०२.२०२४ अखेरची बिंदूनामावली प्रमाणित करण्यास हरकत नसावी.

६. <u>आरक्षण निश्चितीचा प्रस्ताव:-</u>

विभाग प्रमुख या संवर्गात सरळसेवेच्या कोट्यातील पदांचा आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे राहील:-

| अ. क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजक ३.५% | भजब २.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | १ | १ | १ (आळीपाळीने) | | | | | १ | ४ | ८ |
| २ | भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ |
| ३ | रिक्त पदे | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ |
| ४ | दि.३०.०८.२०२४ पर्यंतची संभाव्य रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | एकूण रिक्त पदे (३+४) | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ |
| ६ | मागणीपत्रासाठी उपलब्ध पदे | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ |

विभाग प्रमुख या संवर्गात एकूण ४ रिक्त पदांचे आरक्षण अजा-१, अज-१, विजाअ-१ व इमाव-१ असे राहील. यापूर्वी सदर संवर्गात विजाअ या प्रवर्गाचे पद भरण्यात आले नसल्याची या विभागाची धारणा आहे. सदर धारणा कृपया पक्की करावी.

७. विभाग प्रमुख या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्येनुसार आदुघ आणि साशैमाप्र करिता उपलब्ध असलेल्या १० टक्के आरक्षणानुसार येणारी पदे ही टप्प्याटप्प्याने भरावयाची असल्याने सदर पदे १० टक्के आरक्षणानुसार पूर्ण पदे भरली जाईपर्यंत खुल्या प्रवर्गाकरिता मंजूर पदांची गणना ४८ टक्के नुसार दर्शविण्यात आली आहे.

सदर संवर्गात साशैमाप्र करिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:- (प्रथम भरती वर्ष)

| एकूण भरावयाची पदे | साशैमाप्र करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| ४ | ०.४ पुर्णांकात ० पदे |

सदर संवर्गात आदुघ करिता आरक्षित पदांची गणना पुढीलप्रमाणे राहील:- (प्रथम भरती वर्ष)

| एकूण भरावयाची पदे | आदुघ करिता एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार भरावयाची पदे |
|---|---|
| ४ | ०.४ पुर्णांकात ० पदे |

**अवर सचिव**
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

१५/टि.वि.

८. खालीलप्रमाणे भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चिती करुन देण्यात येत आहे.

| तपशील | अजा १३% | अज ७% | विजाअ ३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | विमाप्र २% | इमाव १९% | साशैमाप्र १०% | आदुघ १०% | अराखीव २८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चालू आरक्षणाची पदे | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ४ |

विभाग प्रमुख या संवर्गातील एकूण ४ रिक्त पदाचे आरक्षण अजा-१, अज-१, विजाअ-१ व इमाव-१ असे राहील. सदर संवर्गात यापूर्वी विजाअ प्रवर्गाच्या उमेदवाराची भरती करण्यात आलेली नाही, अशी या विभागाची धारणा आहे. सदर धारणेच्या अधीन राहून आरक्षण निश्चिती करुन देण्यात येत आहे.

९. सदर सहमती ही केवळ सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आलेली आहे. समांतर आरक्षणाबाबत विभागाने आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी. तसेच, मागणीपत्रात दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाच्या पदाची संख्या विहित आरक्षणानुसार आवश्यक संख्येइतकी आहे किंवा कसे ही बाब विभागाने आपल्या स्तरावरुन खातरजमा करणे आवश्यक आहे.

१०. विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार बिंदुनामावली तपासण्यात आली असून बिंदुनामावल्यांमध्ये तक्रारी किंवा न्यायालयीन प्रकरण उध्दभवल्यास सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील.

११. उपरोक्तप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड या विद्यापीठातील विभाग प्रमुख या संवर्गांच्या सरळसेवा कोट्याच्या दि.२६.०२.२०२४ अखेरच्या बिंदूनामावली तपासणीस व आरक्षण निश्चितीस मान्यता देण्यास हरकत नसावी.

वरील अभिप्रायासह नस्ती उच्च व तंत्र शिक्षण विभागास परत पाठविण्यात यावी.

क.अ.(श्रीम. शिंदे)

अ.स.(श्री. चेमटे)

उ.स.(श्री. खडसे)

सचिव (साविस)(श्री.पाटील)

प्र.स.(उ. व तं.शि.वि.)

**अवर सचिव**
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२